१ सत्र प्रकरण क्रमांक १३४/२०२३
शासन वि. शेख अन्सार
निशाणी क्रमांक ३५/क

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक ०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— हनुमान तुकाराम खांडे

वय :— ४२ वर्षे, व्यवसाय :— शेती.
राहणार :— माळसजवळा, ता. जि. बीड

---

**सरतपासणी {ॲड.ए. एस. तांदळे सहा.सरकारी वकील}**

०१. दि. ०५.०४.२०२१ रोजी मी पिंपळनेर येथे माझे पाहुन्यांकडे गेलो होतो. पोलीस स्टेशनच्या शेजारच्या हॉटेलमध्ये चहा पित होतो. त्यावेळी साहेबांनी आम्हाला पोलीस स्टेशनला बोलावले. त्यांनी सांगितले की मोबाईल जप्त केला आहे व आमचे समक्ष मोबाईल पॅक करुन आमच्या सह्या घेतल्या व आमचे सहिचे लेबल त्यावर चिटकवले त्याचा पंचनामा केला व त्यावर आमच्या सह्या केल्या. मला आता दाखविण्यात आलेला मोबाईल जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३६** वर आहे. मला मोबाईल दाखविल्यास तो ओळखु शकेल.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी आरोपी तर्फे विधीज्ञ एस.बी.शेख**

०२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी जो पंचनामा केला होता तो आम्ही तेथे जाण्या पुर्वीच केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, जप्त केलेल्या मोबाईलचा मालक कोण आहे त्याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोबाईलचा आयएमई आय व नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे. की, मला फक्त पोलीसांनी सही करण्यास सांगितली त्यामुळे मी सही केली व त्या पंचनाम्यात काय लिहीले आहे याची मला महिती नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.18 17:59:13 +0530

**( रेणूका एम. सातव )**
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड

दिनांक : १८/०२/२०२६